SJIF Impact Factor - 5.67

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal


Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B)

## Department of Humanities Organises One Day National Conference

# Azadi Ka Amrit Mahotsava : A Glimpse

75 आज़ादी का अमृत महोत्सव



- Executive Editor -

**Prof.Dr. A.D. Goswami**

Vice-Principal & Head Department of Business Economics
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

- Guest Editor -

**Dr. Mrs. Minakshi V. Waykole**

Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

- Associate Editor -

**Dr. Prafull Ingole**
Head Department of History

**Mr. S. K. Rathod**
Head of Department Psychology

**Dr. Manoj Patil**
Department of Hindi

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College, Bhusawal.

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ
For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

# *Akshara Multidisciplinary Research Journal*

**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**August 2022**

**Special Issue 06 Vol. II (B)**

Department of Humanaties Organises
One Day National Conference

# Azadi Ka Amrit Mahotsava : A Glimpse

**Executive Editor**
**Prof. Dr. A. D. Goswami,**
Vice - Principal & Head Dept. of Business Economics
Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce
College Bhusawal

**Guest Editor**
**Dr.Mrs . Minakshi V.Waykole**
Principal
Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce
College Bhusawal

**Associate Editors**

**Dr. Prafull Ingole**
Head Department of History

**Mr. S. K. Rathod**
Head Of Department Psychology

**Dr. Manoj Patil**
Department of Hindi

Bhusawal Arts , Science and P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Organising Committee Members**

**Dr. S. V. Patil**
Vice-Prin.
**Dr.K.K.Ahire**
**Dr.P.A.Ahire**
**Prof.D.N.Patil**
**Prof.Purushottam Mahajan**
**Dr.Sachin Rajput**

**Prof. B. H. Barhate**
Vice-Prin.
**Dr.J.F.Patil**
**Prof.S.T.Dhum**
**Dr.R.S.Nadekar**
**Dr.Rajendra Tayade**
**Dr.Vitthal Kendre**
**Dr.Lalit Tayade**

**Mr. N. E. Bhangale**
Vice-Prin.
**Dr.S.P.Zanke**
**Prof.V.P.Ladhe**
**Dr.N.N.Zope**
**Dr.Dipak Shirsat**
**Mr. Jitendra Adokar**

*Akshara Publication*
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201



Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
**Akshara Multidisciplinary Research Journal**
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (II) SJIF Impact- 5.67

# Index



| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg. No |
|---|---|---|---|
| 1 | भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार: एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. विजय माटे | 09 |
| 2 | लोकसंख्या विस्फोट भारतासाठी एक समस्या | डॉ.किरण अमृत वारके | 14 |
| 3 | Jotriao Phule's Critique of British Colonial Rule in India | Dr. Liladhar Shivajirao Patil | 17 |
| 4 | नंदुरबार जिल्हयातील सहकार क्षेत्राची चळवळ : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.अरुण उखा पाटील | 20 |
| 5 | भारतीय स्वातंत्र्यानंतर अर्थव्यवस्थेत पशुपालन व्यवसायाची भूमिका | अमोल श्रावण नावस्कर<br>प्रा.डॉ. ए.डी.गोस्वामी | 23 |
| 6 | विसाव्या शतकात महाराष्ट्रातील अंधश्रद्धा विषयक प्रबोधन कार्यात समाज सुधारकांचे योगदान | श्री भरत केवळ आहेर<br>प्रा.डॉ.संजय यशवंत गवळी | 26 |
| 7 | Kamala Das: A Woman's Voice in Post Independence Indian English Literature | Prof. Dr. Smita Sanjay Chaudhari | 30 |
| 8 | स्वातंत्र्य चळवळ आणि मराठी साहित्यानुबंध | डा. जितेंद्र शामसिंग गिरासे | 34 |
| 9 | आजादी के उपरान्त हिन्दी उपन्यासों में आदिवासी संघर्ष | डॉ. सविता काशिराम तायडे | 37 |
| 10 | स्वतंत्र भारत में मराठी संतों द्वारा हिंदी में प्रयुक्त विविध काव्य प्रकार | डॉ. मनोज नामदेव पाटील | 40 |
| 11 | आजादी के 75 वर्ष में बिरसा मुंडा का योगदान | प्रा. डॉ. पिरु गवली | 43 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचे योगदान | दत्तात्रय पांडुरंग कातडे | 45 |
| 13 | महिलांच्या आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्त्व :- विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा | डॉ.दिनेश जेरमा गावीत | 52 |
| 14 | भारतीय स्वातंत्र्य लढा पहिले व दुसरे जागतिक महायुद्ध आणि जळगाव जिल्हा | प्रा. डॉ. दीपक शिरसाट | 56 |
| 15 | संरचनात्मक बदलांची 75 वर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था | डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे | 65 |
| 16 | लोकसंख्येचा विस्फोट | डॉ. संजय वसंत भामरे | 70 |
| 17 | भारतीय स्वातंत्र्य लढयात स्त्रियांची भूमिका | डॉ. शकुंतला एम. भारंबे | 75 |
| 18 | भारतीय शेती : अन्नधान्याची स्वयंपूर्णता स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर | प्रा.डॉ.विनोद झामा मोरे | 80 |
| 19 | स्वातंत्र्योत्तर काल के प्रवासी साहित्य में भारतीय दृष्टि | प्रा. डॉ. जगदीश बी. चव्हाण | 85 |
| 20 | भीष्म साहनी के उपन्यासों में चित्रित राजनैतिक पक्ष | प्रा. डॉ. कृष्णा प्रल्हाद पाटील | 88 |
| 21 | स्वातंत्र्योत्तर मराठी कवितेतील सामाजिक जाणीवा | डॉ. रामलाल चौधरी | 93 |





Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429

AMRJ

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

**15**

# संरचनात्मक बदलांची 75 वर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था

डॉ.विनोद आत्माराम नन्नवरे
अर्थशास्र विभाग प्रमुख
डॉ. अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

---

**प्रस्तावना -**

भारतातील लोकांचा 'कृषी' हा प्रमुख व्यवसाय होता, हे जरी खरे असले तरी भारत हा औद्योगिक दृष्ट्या देखील संपन्न व परिपूर्ण असा देश होता, भारतीय कारागिरांनी आणि उद्योगांनी तयार केलेला माल जगभर प्रसिध्द होता. हे देखील तितकेच खरे आहे. मग यात ढाक्याची मलमल, बंगालचे सुती कापड, बनारसी साड्या आणि विणलेले कापड परदेशांमध्ये अत्यंत लोकप्रिय होते आणि त्याला मोठी मागणी होती.[1] जगातील कोणत्याही देशांचा आर्थिक विकास हा तात्काळ झालेला आपल्याला दिसून येत नाही. आर्थिक विकास दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. आणि त्यामुळेच आर्थिक विकासाच्या आपल्याला वेगवेगळ्या अवस्था दिसून येतात. प्रत्येक अवस्थेचा कालखंड हा वेगवेगळ्या स्वरूपाचा असल्याचे आपल्याला दिसून येतो. भारतावर ब्रिटिशांनी दिडशे वर्षे राज्य केल्यानंतर 15 ऑगस्ट 1947 ला देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि देश ब्रिटिशांच्या वर्चस्वातून मुक्त झाला आणि विकासाची स्वप्न पाहू लागला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिशांनी जे मोठ्या प्रमाणात अपरिमित असे शोषण केलेले होते. त्याची भरपाई करण्यासाठी आणि देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी देशातील तत्कालिक राज्यकर्त्यांनी इतर देशांच्या आर्थिक विकास कोणकोणत्या मार्गाने झालेला आहे. याचा विचार करून देशाच्या आर्थिक विकासाची धोरण आखलेली आपल्याला दिसून येतात.

भारत स्वतंत्र झाल्याबरोबर भारत सरकारने भारतातील विविध आर्थिक समस्या सोडविण्यासाठी आणि भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजन पद्धतीचा अवलंब केलेला होता, ज्यामध्ये समाजवादी आणि भांडवलशाही या दोन्ही तत्त्वांचा समावेश केलेला होता. अर्थात भारताने आर्थिक विकास साधण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केलेला होता. भारतातील आर्थिक नियोजन हे मुखत्वे पंचवार्षिक योजनांवर आधारलेलं आहे, ज्याद्वारे दीर्घकालीन उद्देश साध्य करण्यावर भर देण्यात आलेला आहे. यामध्ये आर्थिक वृद्धी ज्यात स्थूल देशांतर्गत उत्पादन व दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन यात वाढ करणे, रोजगार उपलब्धता, समन्याय वितरण, आधुनिकीकरण आणि स्वयंपूर्णता इत्यादी महत्त्वाच्या उद्देशांचा समावेश आहे. त्याचबरोबर सरकारमार्फत काही अल्पकालीन उद्देशांची वेळोवेळी आखणी करण्यात येते जे पंचवार्षिक योजनानिहाय उद्देश साध्य करण्यासाठी असतात. अर्थात दीर्घकालीन उद्देश आणि अल्पकालीन उद्देश हे परस्परपूरक असतात. आणि म्हणूनच भारताने या उद्देशांच्या पूर्ततेमाठी देशात हरितक्रांती घडून आणणे असेल. बँकांचे राष्ट्रीयकरण करणे या व असे अनेक महत्त्व पुर्ण निर्णय वेळोवेळी घेतल्याचे दिसते.

नियोजनाच्या प्रक्रियेत अल्पकालीन उद्देश हे योजना निहाय आखलेल्या धोरणाचा भाग असतात जे दीर्घकालीन उद्देश किंवा आर्थिक नियोजनाद्वारे आखलेले उद्देश साध्य करण्यासाठी महत्त्वाचे असतात. भारतातील आर्थिक नियोजनाचे सामान्यत: दोन भागांमध्ये वर्गीकरण केले जाते. भारतातील आर्थिक नियोजन पद्धतीत 1991 पूर्वीचे आर्थिक नियोजन व 1991 नंतरचे भारतातील आर्थिक नियोजन पद्धतीमध्ये काही मूलभूत बदल करण्यात आलेले आहेत, ज्यामध्ये आर्थिक उदारीकरणाच्या तत्त्वाचा स्विकार करण्यात आलेला आहे जो मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा पुरस्कार करणारा आहे. याचाच अर्थ अर्थव्यवस्थेवर सरकारचे नियंत्रण कमी करून आर्थिक विकास अधिक गतीने साध्य करण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे हा मुख्य उद्देश 1991नंतरच्या आर्थिक नियोजन नितीचा राहिलेला आहे व या व्यवस्थेत भारत सरकारने नियंत्रित नियामकाच्या ऐवजी सहाय्यकाची जबाबदारी घेतलेली आहे. याबरोबरच 2016 साली नियोजन आयोगाच्या जागी निती आयोग स्थापन करण्यात आलेला आहे.[2]

**उद्दिष्टे :-**

1. भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदलांचा अभ्यास करणे.
2. भारतीय अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकासातील महत्व अभ्यासणे.

**गृहीतके :-**

1. भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये अनेक बदल झालेले आहेत.



Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

2. आर्थिक विकास साधतांना देशातील विविध समस्यांची सोडवणूक करता येऊ शकते.

**संशोधन पद्धती :-**

सदर शोधनिबंध विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेऊन माहिती प्राप्त केलेली आहे.संशोधनात प्रामुख्याने विविध संदर्भ ग्रंथ,वर्तमान पेपर, विविध मासिके, त्रैमासिक, साप्ताहिके,संशोधन पेपर, इन्टरनेट यांच्या सहाय्याने अध्ययन केले आहे.

आर्थिक विकास ही संकल्पना आर्थिक वृद्धी पेक्षा वेगळी आहे आणि व्यापक आहे. आर्थिक विकास ही एक गुणात्मक संकल्पना आहे. यासाठी विकासाची व्याख्या समजून घेणे आवश्यक ठरते. विकास म्हणजे कोणत्याही एका बाजूने झालेली प्रगती नव्हे तर सर्वांगीण झालेली प्रगती म्हणजे विकास म्हणतात. आर्थिक विकासातही विकासाची संकल्पना व्यापक आहे. यामध्ये अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास अपेक्षित आहे. मानवी जीवनमानाचा दर्जा उच्चतम पातळीला नेण्याच्या दृष्टिकोनातून आर्थिक विकास संकल्पना मांडता येते.

विकासामध्ये आर्थिक वृद्धी बरोबरच राष्ट्रीय उत्पन्नाचा वितरणातील इच्छित बदल आणि इतर तांत्रिक व संस्थात्मक बदल यांचा समावेश होतो. आर्थिक वृद्धी होत असताना दरडोई उत्पन्न दारिद्र्य बेरोजगारी वितरण व्यवस्था इत्यादी मध्ये काय बदल होत आहे यातून आर्थिक विकास सूचित होत असतो. म्हणजेच आर्थिक वृद्धी मुळे निर्माण होणारे फायदे हे मर्यादित लोकसंख्य पुरते नराहता सर्वांगीण विकास व सामाजिक,आर्थिक कल्याण साधत असेल तरच त्याला आर्थिक विकास म्हटले जाईल. आर्थिक विकास व आर्थिक वृद्धी या परस्परपूरक संकल्पना असून आर्थिक वृद्धी चे फायदे समाजातील सर्व घटकांना उपलब्ध होणे म्हणजे आर्थिक विकास होय. यावरून आर्थिक विकासाची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडता येईल.

आर्थिक विकास = आर्थिक वृद्धी + सामाजिक, आर्थिक कल्याण[3]

आधुनिकीरणाच्या काळात आज आर्थिक विकासाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. ॲडम स्मिथच्या पूर्वकाळा पासून अर्थशास्त्रज्ञ आर्थिक विकासाच्या समस्येच्या वर आपले विचार मांडत आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वातंत्र झालेल्या अल्पविकसीत देशांनी आर्थिक विकासाकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसते. सर्व देशामध्ये विकासाची प्रबळ प्रेरणा निर्माण झाली आहे आणि त्या दृष्टीने ते देश प्रयत्नशील आहेत. विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध देश जसे वशांतर्गत प्रयत्न करतात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा त्यांचे गट क्रियाशील आहेत. एखाद्या ठिकाणाचे दारिद्र्य हे अन्य ठिकाणच्या संपन्नतेला धोकादायक ठरू शकते त्यामुळे इंग्लड, अमेरिका या देशांनी गरीब देशाच्या विकासाकडे आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते.

आधुनिकीकरणाच्या काळात आपल्या देशात आर्थिक विकासाला खुप महत्त्व प्राप्त झाले आहे. आज आपल्या देशात होत असलेले डिजिटलाझेशन (Digitization), मेक इन इंडिया (Make in India), स्मार्टसिटी (Smart City), स्टार्ट अप (Start Ups) यांचा विकास हा आर्थिक विकासाचाच एक भाग आहे. आर्थिक विकास म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्नात वाढ या वरोवर सामाजिक कल्याणात वाढ हा देखील आर्थिक विकासाचाच भाग आहे. म्हणून आर्थिक विकास संकल्पना समजणे महत्त्वपूर्ण आहे. पुढे आर्थिक विकासा विषयी काही मते स्पष्ट केली आहेत.

आर्थिक विकासाच्या संकल्पनेचा अभ्यास करताना तो दोन बाजूने विचारात घेतला जातो.

**पारंपारिक दृष्टीकोन -** आर्थिक विकास म्हणजे देशाच्या उत्पादन क्षमतेत वाढ होऊन देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात (G.N.P.) किंवा देशी मिश्र उत्पादन (G.D.P.) वाढ होणे होय.

म्हणून पारंपारिक दृष्टिकोनानुसार आर्थिक विकासाचा संबंध दरडोई राष्ट्रीय उत्पनातील वाढीशी जोडलेला दिसून येतो.

**प्रा. मायर आणि बाल्डविन -** आर्थिक विकास ही अशी प्रकिया आहे की, ज्या मध्ये एखाद्या अर्थव्यवस्थेचे वास्तविक दरडोई उत्पन्न दिर्घकाळ पर्यंत वाढत जाते.

**आधुनिक विचार –** केवळ देशातील उत्पनातील वाढीमुळे देशाचा विकास घडून येत नसून त्याकरिता दारिद्र्य, बेरोजगारी आर्थिक विषमतेवर प्रत्यक्ष हल्लाकरून ते नष्ट करणे गरजेचे आहे. आर्थिक विकासाच्या संकल्पनेची नव्याने मांडणी केली आणि आर्थिक विकासाचा सबंध गरिबी निर्मुलन, आर्थिक समानता आणि रोजगार निर्मितीशी जोडला आहे.

**जागतिक बँकेच्या विकासाबाबतचा दृष्टीकोन -**

जागतिक बँकेच्या मते, आर्थिक विकास म्हणजे मानवाच्या दर्जात वाढ करणे असून ही जीवनमानातील वाढ केवळ उत्पादनातील वाढीमुळे घडून येत नसून त्याकरिता चांगल्या प्रकारचे शिक्षण, उच्च प्रतीचे आरोग्य, पोष्टिक आहार, दारिद्र्य निर्मुलन,



Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

स्वच्छ हवामान, समान संधी पर्याप्त प्रमाणात व्यक्तिगत स्वातंत्र आणि उच्च दर्जाच्या सांस्कृतिक मूल्यांची निर्मिती होणे आवश्यक आहे.

**अमर्त्यसेन यांचे विकासाबाबतचे मत -** आर्थिक वृद्धी म्हणजे गरजांची पूर्तता नसून मानव जे जीवन जगतो आणि जी स्वातंत्रे उपभोगतो त्यांचा दर्जा वाढवण्याशी विकासाचा संबंध असला पाहिजे. त्यांच्या मते, आर्थिक विकासामुळे व्यक्तीच्या क्षमतेत वाढ झाली पाहिजे. डॉ. सेन यांचा विकासाचा दृष्टीकोन आरोग्य आणि शिक्षणावर मोठा भर देतो. आर्थिक विकास म्हणजे उत्पनातील वाढी बरोबर व्यक्तिगत स्वातंत्र सर्वांना होऊन त्यांच्या गरजांची पूर्तता होणे होय.

जागतिक विकासाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने सप्टेंबर 2000 मध्ये सहस्र विकासाची ध्येये निश्चित करून ती 2015 पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविले होते. तेव्हा संपूर्ण जगाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या आर्थिक विकास संकल्पनेचा अर्थ पाहिला. आर्थिक विकासात केवळ उत्पादन वाढच नव्हे तर उत्पादन घटक आणि उत्पादन यांच्या रचनेत होणारे बदल, उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानात होणारे बदल, सामाजिक दृष्टीकोन, सांस्कृतिक वातावरण आणि समाजातील विविध संस्थामध्ये होणारे फेर बदल महत्वपुर्ण मानले जातात.

थोडक्यात आर्थिक विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय किंवा दरडोई उत्पन्नात वाढ नसून सामाजिक कल्याणात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय.[4]

**स्वातंत्र्यानंतर भारताच्या आर्थिक रचनेत लक्षणीय संरचनात्मक बदल –**

परिमाणात्मक दृष्टीने वाढीशिवाय, स्वातंत्र्यानंतर भारताच्या आर्थिक रचनेत लक्षणीय बदल झाले आहेत.

1. देशांतर्गत उत्पादनाचे क्षेत्रीय वितरण :-

देशांतर्गत उत्पादनाच्या रचनेतील बदल किंवा मूळ उद्योगाद्वारे राष्ट्रीय उत्पन्नातील बदल म्हणजे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांच्या सापेक्ष महत्त्व (शेअर) मध्ये बदल. साधारणपणे, अर्थव्यवस्था तीन प्रमुख क्षेत्रांमध्ये विभागली जाते उदा. प्राथमिक, माध्यमिक आणि तृतीयक क्षेत्र.

प्राथमिक क्षेत्रामध्ये कृषी आणि संलग्न क्रियाकलापांचा समावेश होतो, दुय्यम क्षेत्रात उत्पादन उद्योगांचा समावेश होतो आणि तृतीय श्रेणीमध्ये सेवांचा समावेश होतो. विकास प्रक्रियेसह, प्राथमिक क्षेत्राचे महत्त्व कमी होते तर दुय्यम आणि तृतीयक क्षेत्रांचे महत्त्व वाढते. स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेतही असे बदल झाले आहेत.

1960 च्या दशकात हरित क्रांतीचे आगमन देशासाठी महत्वपूर्ण ठरले. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि उच्च उत्पन्न देणाऱ्या विविध बियाण्यांचे उत्पादन करण्याच्या पद्धतींचा अवलंब केला गेला. ज्यामुळे कृषी उत्पादकता लक्षणीयरीत्या वाढली आणि अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली. घटक खर्चावर (1999-2000 किमतीनुसार) जीडीपीमध्ये प्राथमिक क्षेत्राचा वाटा जो 1950-51 मध्ये 56.5 टक्के होता तो 1990-91 मध्ये 34.6 टक्के आणि नंतर 2007-08 मध्ये 19.7 टक्क्यांवर घसरला. तर 2021-22 मध्ये कृषी विकास दर 3.9 % राहणार, आधीच्या वर्षी हा दर 3.6% होता.

1950-51 मध्ये GDP मधील दुय्यम क्षेत्राचा वाटा 13.6 टक्के होता तो 1990-91 मध्ये 23.2 टक्के आणि पुढे 2007-08 मध्ये 24.7 टक्के झाला. औद्योगिक क्षेत्राचा 2020-21 मधे 7% इतका कमी झाल्यानंतर 2021-22 मध्ये वेगाने उसळी घेत 11.8% इतक्या विस्तारला आहे. तर जीडीपीमध्ये तृतीयक क्षेत्राचा वाटा 1950-51 मध्ये 29.9 टक्क्यांवरून 2007-08 मध्ये 55.6 टक्क्यांपर्यंत वाढला आणि 2009-10 मध्ये तो 7 टक्क्यांहून अधिक होता. गेल्या वर्षीच्या 8.4% इतक्या घटल्यानंतर सेवा क्षेत्रात 2021-22 मध्ये 8.2% वृद्धी झाली.[5]

2. मूलभूत भांडवली वस्तू उद्योगांची वाढ :-

भारताने स्वातंत्र्यानंतर औद्योगिक विकासाच्या बाबतीतही लक्षणीय प्रगती केली आहे. 1991 च्या औद्योगिक धोरणाने एक मोठी आर्थिक सुधारणा तयार केली आणि औद्योगिक क्षेत्राला पुनरुज्जीवित करण्यासाठी आणण्यात आले. या धोरणाने औद्योगिक परवाना देण्याची प्रणाली मोडून काढली आणि खाजगी क्षेत्राच्या अधिक सहभागासाठी तसेच परदेशी गुंतवणुकीसाठी हे क्षेत्र खुले केले. जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा एकूण औद्योगिक उत्पादनात मूलभूत आणि भांडवली वस्तूंच्या उद्योगांचा वाटा अंदाजे एक चतुर्थांश होता.

दुसऱ्या योजनेअंतर्गत, भांडवली वस्तूंच्या उद्योगांना उच्च प्राधान्य देण्यात आले कारण त्यांचा विकास ही अर्थव्यवस्थेच्या एकूण वाढीसाठी पूर्व-आवश्यकता मानली गेली. परिणामी, भांडवली उपकरणे आणि उपयुक्त कच्चा माल तयार करणारे मूलभूत उद्योग मोठ्या संख्येने उभारले गेले आहेत ज्यामुळे देशाची औद्योगिक रचना खूपच मजबूत झाली आहे.



Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B)
SJIF Impact- 5.67

**3. सामाजिक भांडवलामध्ये विस्तार :-**

सामाजिक भांडवलामध्ये वाहतूक सुविधा, सिंचन व्यवस्था, ऊर्जा उत्पादन, शैक्षणिक व्यवस्था आणि संघटना आणि आरोग्य सुविधा यांचा समावेश होतो. त्यांचा विकास वाढीसाठी आणि चांगल्या मानवी जीवनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करतो. भारतातील वाहतूक व्यवस्था क्षमता आणि आधुनिकीकरण या दोन्ही बाबतीत वाढली आहे. रेल्वे मार्गाची लांबी 9 हजार किमी पेक्षा जास्त वाढली आणि ऑपरेशन फ्लीट व्यावहारिकरित्या दुप्पट झाला. विविध योजनांतर्गत रस्त्यांच्या नेत्रदीपक विकासामुळे भारतीय रस्त्यांचे जाळे आता जगातील सर्वात मोठे नेटवर्क बनले आहे. भारताने आयुर्मनता आणि साक्षरता दरातही वाढ झाली आहे परंतु शिक्षणाचा अपेक्षित दराने विस्तार झालेला नाही.

राष्ट्रीय आणि राज्य महामार्गाची लांबी देखील लक्षणीयरीत्या वाढली आहे तर नोंदणीकृत वाहनांची संख्या 1950-51 मध्ये 0.31 दशलक्ष वरून 2016-17 मध्ये सुमारे 253 दशलक्ष झाली आहे. नागरी उड्डाण क्षेत्रातही प्रचंड वाढ झाली आहे, 1980-81 दरम्यान प्रवाशांची संख्या केवळ 10.74 दशलक्ष वरून 2018-19 मध्ये अंदाजे 345 दशलक्ष इतकी वाढली आहे.

भारताच्या उर्जा क्षेत्रातही लक्षणीय वैविध्य आले आहे आणि स्वातंत्र्यानंतर बरीच प्रगती झाली आहे. जल, औष्णिक आणि आण्विक क्षेत्राद्वारे निर्माण होणारी एकूण ऊर्जा 1950-51 मध्ये केवळ 5.1 अब्ज KWH वरून 2017-18 मध्ये 1,303.5 अब्ज KWH पर्यंत वाढली. भारताची स्थापित संयंत्र क्षमता 1950-51 मध्ये केवळ 2.3 हजार मेगावॅटवरून 2017-18 पर्यंत 399 हजार मेगावॅटवर गेली.

**4. बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील प्रगती:-**

स्वातंत्र्यानंतर, भारताच्या बँकिंग आणि वित्तीय संरचनेत महत्त्वपूर्ण प्रगतीशील बदल घडून आले आहेत. व्यापारी बँका आणि सहकारी संस्थांची वाढ खरोखरच नेत्रदीपक झाली आहे आणि त्यामुळे देशी बँकर्स आणि सावकारांचे महत्त्व कमी झाले आहे. राष्ट्रीयीकरणानंतर या बँकांनी त्यांच्या पतधोरणात आमूलाग्र बदल केला आहे. आता कृषी, लघुउद्योग, वाहतूक इत्यादी प्राधान्य क्षेत्रांसाठी अधिक निधी उपलब्ध करून दिला जातो. भांडवली वस्तूंच्या उद्योगांची वाढ, पायाभूत सुविधांचा विस्तार, सार्वजनिक क्षेत्राची कामगिरी इत्यादींचा विचार करताना भारतीय अर्थव्यवस्थेने संरचनात्मकदृष्ट्या प्रगती केली आहे. गेल्या काही वर्षांत या घटकांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत गतिमानता निर्माण झाली आहे असे मानले जाते आणि त्यामुळे भविष्यात विकास टिकून राहील असे आता कोणीही म्हणू शकतो.[6] 1947 पासून, भारताने वाढ, उत्पन्नाची पातळी आणि राहणीमानाचा दर्जा वाढवण्यात प्रचंड प्रगती साधली आहे. सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) 1950-51 च्या 2,939 अब्ज रुपयांवरून 2011-12 (2004-05 स्थिर किंमती) दरम्यान 56,330 अब्ज रुपयांपर्यंत वाढले. 2018-19 मध्ये, भारताचा GDP अंदाजे रु. 1,40,776 अब्ज (2011-12 स्थिर किंमती) होता.

उत्पादनाच्या परिस्थितीत अनेक क्षेत्रांनी गती प्राप्त केली. केवळ 3 ऑटोमोबाईल कंपन्यांमधून, ऑटोमोटिव्ह क्षेत्राने जागतिक बहुराष्ट्रीय कंपन्यांना आकर्षित केले आणि जागतिक गुणवत्ता मानकांच्या उत्पादनांची श्रेणी तयार केली. फार्मास्युटिकल्समध्ये, भारत आता एक प्रमुख उत्पादक आहे आणि नवीन औषधे विकसित करण्यासाठी संशोधन करतो. अभियांत्रिकी आणि इलेक्ट्रिकल मशिनरी वस्तू देखील जागतिक बेंचमार्कमध्ये विकसित झाल्या आहेत. 2022-23 मध्ये भारताचा विकास दर 8.0 ते 8.5 % राहण्याचा अंदाज आहे. जागतिक बँक, आशियाई विकास बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या अनुसार 2021-24 मध्ये भारताची अर्थव्यवस्था ही जगातली सर्वात वेगाने वृद्धींगत होणारी महत्वाची अर्थव्यवस्था असणार आहे.[7]

**निष्कर्ष –**

1. भारत संरचनात्मक दृष्ट्या स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात परिपूर्ण असा देश आहे.
2. भारताने स्वातंत्र प्राप्तीनंतर मिश्र अर्थव्यवस्थेचा आधार घेऊन आर्थिक विकासाला सुरुवात केली परिणामी भारत विकासाच्या विविध अवस्था पादाक्रांत करत आहे.
3. भारताने स्वतंत्र प्राप्तीनंतर दीर्घकालीन विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ करणे समन्याय, आधुनिकीकरण, आणि स्वयंपूर्णता प्रस्थापित करणे रोजगारात वाढ करणे यासारखे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आर्थिक विकास साधत आहे.
4. आर्थिक उदारीकरणा आधी आणि नंतर अनेक सुधारणा या आर्थिक विकासाच्या दृष्टीने केल्या आहेत.
5. स्वातंत्र प्राप्तीनंतर मानवी जीवनाचा दर्जा उच्चतम पातळी गाठत आहे.
6. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमध्ये झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयाला येत आहे.



Scanned with CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
August 2022 Special Issue 06 Volume II (B) SJIF Impact- 5.67

7. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात अनेक बदल प्राथमिक, दुय्यम, तृतीय क्षेत्रांमध्ये झालेले आहेत.
8. देशात मूलभूत आणि भांडवली उद्योग भांडवली वस्तू उद्योगाची वाढ झपाट्याने झालेली आहे.
9. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संरचनात्मक बदलांसोबत आधुनिकीकरण देखील झालेले आहे.
10. देशात अनेक विविध बदल होत आहेत. यात डिजिटलायझेशन मेक इन इंडिया, स्मार्ट सिटी, स्टार्ट अप अशा कितीतरी योजना आहे आर्थिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

संदर्भ -

1. भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण आणि विकास – श्रीधर देशपांडे, विनायक देशपांडे – हिमालया पब्लिशिंग हाऊस – नागपूर
2. https://www.loksatta.com/career-vrutantta/upsc-exam-upsc-exam-study-ssh-93-2542177/
3. https://www.nitinsir.in/arthik-vikas/
4. https://gopract.com/Economics/Economic-Growth-Marathi.aspx
5. https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1793873
6. https://www.yourarticlelibrary.com/economics/4-significant-structural-changes- in-indias-economic-structure-since-independence/2754
7. https://www.ciiblog.in/the-evolution-of-the-indian-economy-since-independence/

□ □ □



Scanned with CamScanner